
Review of Research
International Online Multidisciplinary Journal

ISSN : 2249-894X Impact Factor 3.1402 (UIF) Volume -5 | Issue - 6 | March - 2016

# ॲडम स्मिथ यांचे आर्थिक विचार - एक चिकित्सा



प्रा.देशमुख शेषनारायण किसनराव
माऊली महाविद्यालय,वडाळा.

**प्रस्तावना -**

निसर्ग तत्वावरील श्रध्दा आणि निसर्ग व्यवस्थेचा हितकर आशावाद या दोन सुत्रावर आधारित आपले विचार ॲडम स्मिथ यांनी आपल्या राष्ट्राची संपत्ती १७७६ या ग्रंथातून मांडले. तत्कालीन आर्थिक धोरणावर त्यांच्या या ग्रंथाचा प्रभाव पडल्यामुळे स्मिथ यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली.त्यामुळे त्यांना अर्थशास्त्रांचा जनक असे म्हटले जाते.युरोपातील राकीय,सामाजिक,आर्थिक घटकाच्या स्थित्यंतराचा प्रभाव स्मिथच्या विचारावर दिसून येतो.स्मिथला सनातनवादी संप्रदायाचा जनक म्हणून ओळखले जाते.स्मिथ यांनी अभिजात विचारांची पंरपरा सुरू केली.स्मिथ यांच्या काळात इंग्लड मधील आर्थिक राजकीय क्षेत्रात जे क्रांतीकारक बदल झाले त्याचा परिणाम स्मिथ यांच्या विचारसरणीवर व तत्वज्ञानावर झालेला आहे.दरम्यानच्या कालखंडामध्ये पाश्चीमात्य उत्पादन तंत्रात आणि पदध्तीत नवीन शोध लागल्यामुळे भांडवल,उत्पादन,उत्पादकता यांचे प्रमाण वाढले त्याचबरोबर शेती उप्तपादनी वाढले त्यामुळे साहजिकच व्यापारातही वाढ झाली या सर्व घटनांचा अँडम स्मिथ यांच्या लिखाणावर परिणाम झाला.

**संशोधनाचा उद्देश -**

१) ॲडम स्मिथ यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे
२) ॲडम स्मिथ यांच्या आर्थिक विचारांची आजच्या काळातील गरज तपासणे .
३) सनातन संप्रदायाच्या विचारसरणीचा पाया तपासणे .

**संशोधन पदध्ती -** उपरोक्त संशोधन दूय्यम माहितीवर आधारित आहे.यासाठी विविध पुस्तके , मासिके व लेख यांचा वापर करण्यात आला आहे.

**ॲडम स्मिथ यांचे आर्थिकविचार - -**

**१.स्मिथचा निर्सगवाद -** ॲडम स्मिथ यांच्या मते सर्व आर्थिक संस्था व्यक्तीने अथवा सरकारने निर्माण केलेल्या नाहीत तर त्या मानवाच्या स्वार्थी हेतुने निर्माण झालेल्या आहेत मानसाकडे एक अदृश्य हात आहे.तो नेहमी स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करतो यातून सर्व व्यवहार सुरळीत पार पडतात म्हणजेच अनेक संस्थाची निर्मिती ही वैयक्तीक स्वार्थ साधण्याच्या भुमिकेतुन निर्माण झाली आहे.यातून अर्थव्यवस्थेतील पैसा,लोकसंख्या,चलनसंस्था इ संस्थाची निर्मीती झाली.आहे.ही निर्मिती स्वार्थी व नैसर्गिक हेतुने झाली आहे.

**२.स्मिथचा आशावाद -** स्मिथ हा आशावादी अर्थतज्ञ होता त्यांच्या मते जे निसर्गदत्त आहे ते सर्व मानवाला उपकारक व हितकारक आहे.समाजामध्ये असमा-या श्रमविभागणी,पैसा,भांडवल,स्पर्धा याचे प्रमाणे ओपोआपच पर्याप्त रहाते त्याचे कारण निसर्ग यामध्ये समतोल साधतो अशा आशावाद स्मिथ यांना आहे.

**३. ॲडम स्मिथ यांचे शेतीविषयक विचार -** ॲडम स्मिथ यांच्या मते नवनिर्मिती व उत्पादन क्षमता फक्त शेतीमद्ये आहे. आणि शेतीचा विकास होताना व उत्पादन वाढत असताना सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा व पर्यावरण संतुलनाचा मानुस स्वार्थी हेतुने समतोल साधतो व तांत्रिक व सामाजिक प्रगती बरोबर शेती उत्पादन वाढत असताना पर्यावरणाचा समतोल राखला जोता व सातत्यरथ सेती विकास साधला जातो.

**४. ॲडम स्मिथ यांचेउद्योग विषयक विचार -** ॲडम स्मिथ हा निसर्गवादी अर्थतज्ञ असल्याने तो पुर्णता सरकार्चाय हस्तक्षेपाच्या विरोधात होता म्हणेजच निर्हस्तशेष नितीचा पुरस्कती होता.त्याच्या मते औद्योकि उत्पादन वाढवण्यासाठी श्रम विभागणी करून उत्पादन वाढवले पाहिजे व त्यातून भांडवल संचय वाढवला पाहिजे . श्रम विभागणीने उत्पादन दोनशे चाळीपट वाढते हे स्मिथ यांनी दाखवून दिले आहे.त्यातून भांडवल संचय वाढवावा व नवीन उद्योगाची स्थापना करावी व रोजगार निर्मीती वाढवून राष्ट्रीय उत्पन्न व आर्थिक विकास करावा अशी भुमिका त्यांनी मांडली आहे.

**५. ॲडम स्मिथ यांचे श्रम विभागणी विषयक विचार -** श्रम विभागणी विषयक ॲडम स्मिथ यांनी अतिशय सविस्तर विवेचन केले आहे.त्यांच्या मते सर्व संपत्तीची निर्मीती श्रमातुनच होते म्हणून संपत्तीची वाढ करावयाची असेल तर श्रम विभागणीच्या तत्वावर अर्थ व्यवस्थेची उभारणी झाली पाहिजे यामुळेच उत्पादन खुप मोठ्या प्रमाणावर वाढते त्याचबरोबर वेगवेगळी कौशल्य असमा-या कामगारांच्या क्षमतांचा फायदा घेता येतो.तायतुनच संशोधन करून वेळेची बचत करून उत्पादन खर्च ही कमी करता येऊ शकतो व एकुण उत्पादन वाढवता येते.

**६. ॲडम स्मिथ यांचा मुल्य सिध्दांत -**

यामध्ये त्यांनी उपयोगिता मुल्य व विनिमय मुल्य अशा पदध्तीने स्पष्टीकरण केले आहे.

**१. उपयोगिता मुल्य -** उपयोगितेवरून ठरलेल्या मुल्याला उपयोगिता मुल्य असे म्हटले जाते.उदा.हवा,पाणी इ.

**२. विनिमय मुल्य -** एक वस्तु देऊन तिच्या बदल्यात दुस-या किती वस्तु मिळतात त्याला विनिमय मुल्य असे म्हणतात. ॲडम स्मिथ यांच्या मते पाण्याइतकी अतिशय उपयुक्त वस्तु दिली तर तिच्या मोबदल्यात इतर वस्तुंचे थोडेही नग मिळत नाहीत याउलट हि-या सारख्या उपयोग नसलेल्या वस्तुंच्या बदल्यात किती तरी जास्त वस्तु मिळवता येतात.यावरून स्मिथने अशा निष्कर्ष काढला की ज्या वस्तुंना सर्वात जास्त उपयुक्तांना मुल्य असते.त्यांना विनिमय मुल्य असते.त्यांना उपयोगिता मुल्य असत नाही.त्यांच्या मते श्रम ही वस्तु वस्तुचे मुल्य मोजण्याची फुटपटी असते.म्हणजेच एखादी वस्तु निर्माण करण्यासाठी जेवढे श्रम लागते तेवढी त्या वस्तुची किमंत असते.

**७. विभाजन विषय विचार -** राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन भुमी,श्रम,भांडवल व संयोजक या उत्पादन घटकांमध्ये केले जाते.अ) स्मिथ यांच्या मते श्रमिकांचे वेतन श्रम-मुल्य सिध्दांता प्रमाणे ठरते.समाज प्रगत झाल्यावर उत्पादन घटक वाढतात व त्यांचा हिस्साही द्यावा लागतो व त्यातून जे अधिकच रहाते ते सर्व कामगारांना दिले पाहिजे याला तो अवशेषधारी सिध्दांत असे म्हणतो.ब) नफा व व्याज - भांडवलला दिला जाणारा मोबदला म्हणजे नफा होय.भांडवल स्वत:चे असेल तर तो त्याला नफा म्हणतो व ते दुस-याकडुन घेतले असेल तर तो त्याला व्याज म्हणतो.क) खंडाविषयक विचार - स्मिथ हा निसर्गवादी अर्थतज्ञ असल्यामुळे निसर्गाच्या कृपेमुळे खंड मिळणारे उत्पन्न म्हणजे खंड होय.स्मिथच्या मते १.निसर्गाच्या कृपमुळे मिळणारे उत्पन्न म्हणजे खंड होय २.जमिनीच्या मालकीमुळे मिळणारे उतपन्न म्हणजे खंड होय ३.जमिनीमध्ये असणा-या गुण भिन्नतेमुळे मिळणारे उत्पन्न म्हणजे खंड होय.

**८. ॲडम स्मिथ यांचे आर्थिक विकासाबाबतचे विचार -** स्मिथ यांच्या मते संपत्ती किती आहे यापेक्षा ती उत्पादक असली पाहिजे म्हणजेच संपत्ती वाढती असली पाहिजे.म्हणजेच संपत्ती वाढती असली पाहिजे.यासाठी त्यांनी श्रमविभागणी व वाढता भांडवल संचय यावर भर दिला आहे.नव्या तंत्रज्ञानामुळे भांडवल संचय व अधिक्य वाढेल यावर त्यांनी अधिक भर दिला आहे.त्यांच्या मते तांत्रिक प्रगती ,उत्पादनवाढ,भांडवल संचय यातून आर्थिक प्रगती याबाबत त्यांनी आशावाद व्यक्त केला आहे.

**९.आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक विचार -** स्मिथ हे निसर्गवादी अर्थतज्ञ असल्यामुळे त्यांनी खुल्या व्यापाराचे समर्थन केले आहे.त्यांच्या मते निकोप स्पर्धेमुळे ग्राहकाला कमी किमंतीमध्ये वस्तु उपलब्ध होतील,मक्तेदारी निर्माण होणार नाही यातून खुल्या व्यापाराचे अनेक फायदे त्यांनी विषद केले आहेत.१) संरक्षण धोरणामुळे फक्त विशिष्ट उद्योगात गुंतुणुक होईल.२) प्रादेशिक श्रम- विभागणीचा फायदा जगभर मिळेल. ३) आयात निर्यात वाढून ती लाभदायक होईल.

**१०. ॲडम स्मिथ यांची निर्हस्तक्षेप निती -** सरकारने अर्थव्यवस्थेमद्ये कसलाही हस्तक्षेप न करणे म्हणजे निर्हस्तक्षेप नितीचा स्विकार करावा असे मत स्मिथ यांनी मांडले.त्यांच्या मते सरकारने न्यायदान,कायदा सुव्यवस्था,परकीय आक्रमणा पासून संरक्षण अशी किमान कामे

करावीत.जर सरकारने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप केला तर उत्पादनात अडथळे निर्माण होतात.कारण सरकारी नोकरशाही कुचकामी असते,काटकसरी नसते.शेती व व्यापारविषयक ज्ञानाचा त्यांना अभाव असतो.

**११. ॲडम स्मिथ यांचे भांडवल विषयक विचार -** राष्ट्राची संपत्ती या ग्रंथामध्ये ॲडम स्मिथ यांनी भांडवल संचयास खुप महत्व दिले आहे.त्यांच्या मते भांडवल संचय केल्यामुळे उद्योगधंदे वाढीस लागतील तसेच श्रम विभागणी व रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणावर करता येईल.यातून मोठ्या प्रमाणात सार्वजिक कल्याणात वाढ होईल.त्यांच्या मते भांडवल गुंतवणूक शेती क्षेत्रात जास्त लाभदायक असते.त्यांनी उद्योग व व्यापारातही गुंतवणुकीचे समर्थन केले आहे.

**१२. ॲडम स्मिथ यांचे करविषयक विचार -** स्मिथ यांच्या मते लोकांना कर आपलेसे वाटले पाहिजे. त्यांनी मौलिक अशा कर कसोट्या सुचवल्या आहेत. त्यामध्ये त्यांनी समता तत्व , निश्चिततेचे तत्व ,सोयीस्करतेचे तत्व,मितव्ययतेचे तत्व.अशा तत्वांच्या आधारे कर संकलन केले तर कर देणा-याला कर सहजतेने भर सोपे होईल,कर उत्पादक होतील यातून सरकारचा भांडवल संचय होऊन मोठ्या प्रमाणात लोकांचे कल्याण साधता येईल.स्मिथ यांच्या कर कसोट्या आज ही आदर्श मानल्या जातात.

## निष्कर्ष -

१.स्मिथ यांनी श्रमविभागणी आणि विशेषीकरण करून उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढविण्यावर भर दिला आहे.
२.स्मिथ यांच्या कर कसोट्या आजही उपयुक्त ठरतात.
३.स्मिथ निर्हस्तक्षेप नितीचे समर्थक होते.
४.स्मिथ यांनी आधुनिक अर्थशास्त्राचे बीजारोपन केले.
५.स्मिथ यांचे अनेक विचार आजही उपयुक्त आहेत.

## सारांश -

स्मिथ यांनी व्यक्ती स्वातंत्र्या बरोबर मक्तेदारी निर्माण होणार नाही या गोष्टीवर भर दिला आहे.स्मिथ हे निसर्गवादी असल्यामुळे त्यांनी शेती ,श्रम या संकल्पनांना खुप महत्व दिले आहे.तसेच आजच्या ब-याच आर्थिक सिध्दांताचा पाया त्यांच्या लिखानात दिसून येतो.म्हणून त्यांना सनातन संप्रदायाचे संस्थापक व अर्थशास्त्राचे जनक मानले जाते.

## संदर्भग्रंथ सुची -

१.History of Economics Thought.- Bhatia H.L.
२.आर्थिक विचारांचा इतिहास - पाटील जे.एफ.
३.आर्थिक विचारोंका इतिहास - पंत जे.सी.
४.आर्थिक विचार व विचारवंत - डॉ.बी.डी. कुलकर्णी आणि डॉ.एस.व्ही ढमढेरे.